# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ६४-२३** **दिनांक :- २०/०२/२०२३**

## अवैध अग्निशस्त्र विक्री करण्यासाठी आलेल्या आरोपीतास अटक
## गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कारवाई.

दिनांक २५/०२/२०२३ रोजी गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ओम साई पॅलेस बारचे जवळ, ओसवालनगरी, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर या ठिकाणी एक ईसम गावठी बनावटीचा कटटा विक्रीकरीता घेवून येणार आहे.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने श्री. शाहुराज रणवरे, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन गुन्हे शाखेतील अधिकारी, अंमलदार व पंचासह सापळा कारवाई करुन आरोपीत नामे पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती रा. सुरज गवारी चाळ, जानकी पाडा, आंबेडकरनगर, गोखीवरे, वसई पु. जि. पालघर यास काळया रंगाची ॲक्टीव्हा मोटार सायकल क्र. एम. एच. ०४ डीसी ३४६९ सह ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन १ गावठी बनावटीचा कट्टा, २ जिवंत काडतुसे आणि १ रामपुरी चाकु असे हत्यारे मिळून आल्याने त्यास वरील मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. सदर आरोविरुध्द पो.हवा. सचिन विलास पाटील नेम. गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणेत भा.ह.का. कलम ३, २५ (१) (ब) सह म.पो.का. कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सागर शिंदे, सुहास कांबळे, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर यांनी केली आहे.

-----ooo-----